खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२२–२३

### मराठी विभाग : पुस्तक भेट उपक्रम

पुढारी

# 'वैचारिक समृद्धीसाठी वाचन गरजेचे'

**राजगुरुनगर : पुढारी वृत्तसेवा**

पुस्तकांच्या वाचनातून ज्ञानात भर पडत असते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी वैचारिक समृद्धीसाठी अवांतर वाचन करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी केले. हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने वाचनसंस्कृतीच्या प्रसारासाठी सोमवारी (दि. २१) आयोजित केलेल्या पुस्तकभेट उपक्रमात ते बोलत होते.

संस्थेचे संचालक हिरामण सातकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, डॉ. दिलीप मुळूक, डॉ. बाळासाहेब अनुसे, प्रा. किशोर लांडे पाटील, प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. डी. एम. मारकड, डॉ. योगेश वाळुंज, डॉ. गणेश धुमाळ, डॉ. प्रभाकर जगताप या वेळी उपस्थित होते.



तृप्ती ओंबास हिला पुस्तक भेट देताना ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील.

ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी मराठी विभागाच्या वतीने दरवर्षी राबविण्यात येणाऱ्या अशा उपक्रमांबद्दल आनंद व्यक्त करून ते पुढे म्हणाले की, सुसंस्कृत समाजनिर्मितीसाठी वाचनसंस्कार आवश्यक आहे. अक्षरवाङ्मयाची आवड असणारे अधिकाधिक विद्यार्थी घडावेत, यासाठी प्राध्यापकांनी प्रयत्नशील राहण्याचे आवाहन त्यांनी केले.

प्रास्ताविक डॉ. संजय शिंदे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. संजय शिंदे यांनी केले. डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी आभार मानले.

My Gramin Edition
Aug 24, 2022 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

# पुस्तकांच्या वाचनातून ज्ञानात भर -बुट्टेपाटील

**राजगुरूनगर, दि. २३ (प्रतिनिधी)** - पुस्तकांच्या वाचनातून ज्ञानात भर पडत असते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी वैचारिक समृद्धीसाठी अवांतर वाचन करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी केले.

येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने वाचन संस्कृतीच्या प्रसारासाठी आयोजित पुस्तक भेट कार्यक्रमात बोलत होते. याप्रसंगी संचालक हिरामण सातकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, डॉ. दिलीप मुळूक, डॉ. बाळासाहेब अनुसे, प्रा. किशोर लांडे, प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. डी. एम. मारकड, डॉ. योगेश वाळुंज, डॉ. गणेश धुमाळ, डॉ. प्रभाकर जगताप उपस्थित होते.

ॲड. बुट्टे पाटील म्हणाले, सुसंस्कृत समाज निर्मितीसाठी वाचन संस्कार आवश्यक आहेत. विद्यार्थ्यांनी पुस्तकांच्या देवाणघेवाणीतून ज्ञानाचा प्रसार करावा. वाचन संस्कृती जोपासावी. महाविद्यालयात अक्षर वाङ्मयाची आवड असणारे अधिकाधिक विद्यार्थी घडावेत, यासाठी प्राध्यापकांनी प्रयत्नशील राहावे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना डॉ. संजय शिंदे यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड रूजावी, त्यांच्यावर पुस्तकांच्या सहवासाचा संस्कार व्हावा यासाठी जाणीवपूर्वक पुस्तके भेट उपक्रमाचे आयोजन केल्याचे सांगितले. सूत्रसंचालन डॉ. संजय शिंदे यांनी तर डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी आभार मानले.

**डॉ. संजय शिंदे**
**प्रसिद्धी विभागप्रमुख**